30/8/24
4:15

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ३०/०८/२०२४

# प्रेसनोट

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तथा जिल्हा क्रीडा परिषद ठाणे व उल्हासनगर महानगरपालिका द्वारे आयोजित जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ दिनांक ३० ऑगस्ट २०२४ ते डिसेंबर २०२४ पर्यतचे आयोजन मा. आयुक्त तथा प्रशासक मा. विकास ढाकणे, साहेब व अतिरिक्त आयुक्त, मा. जमिर लेंगरेकर, साहेब डॉ. सुभाष जाधव, उप-आयुक्त (क्रीडा) यांच्या मार्गदर्शनानुसार, दिनांक ३० ऑगस्ट रोजी जिल्हा स्तरीय बुध्दीबळ खेळापासुन, एस. एस. टी कॉलेज, उल्हासनगर-४ येथुन सुरवात करण्यात आली. मागील वर्षी २०२३-२४ मधिल विभागीय स्पर्धेत संपुर्ण ठाणे, जिल्ह्यातुन १९ वर्ष वयोगटातील पहिले तिन क्रमांकाचे पारितोषिक मिळविण्याचा मान उल्हासनगर महानगरपालिकेस मिळाला. प्रथम क्रमांकाचे पारितोषिक सी. एच. एम. कॉलेज, दुसरा एस. एस. टी. कॉलेज, तर तिसरा वेदांता कॉलेज, वयोगट १७ एस. ई. एस. हायस्कुल, वयोगट १४ स्वामी देवप्रकाश स्कुल, यांचे मा. अशोक शिंगारे, साहेब जिल्हा अधिकारी, ठाणे, यांच्या हस्ते धनादेश देवुन सन्मानित करण्यात आले.

सदर बुध्दीबळ स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी एस. एस. टी. कॉलेजचे डॉ. जे. सी. पुरस्वानी, श्री. शांताराम चौधरी, क्रीडा अधिकारी, श्री. सुशिल इनामदार, सेवा निवृत्त क्रीडा शिक्षक श्री. प्रल्हाद कोलते सर, समितीचे सदस्य श्री. राहुल अकुल, संजय डमाळे, शिवराज सर, विक्रम काळे, संजय पाटील, व इतर शाळेचे शिक्षक पुष्कर पवार, उदय पवार, दक्षता पवार, प्रशांत कुंभारडे, प्रफुल सर, या मान्यवरांच्या उपस्थितीत सदर स्पर्धेस सुरवात करण्यात आली.

30/8/24

(छाया प्रकाश डोंगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करवी.

Scanned with CamScanner